# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना
**P.S.(ठाणे):** कदीम -जालना
**Year (वर्ष):** 2024
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0507
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 22:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरुवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 19/12/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/12/2024
**Time From (वेळेपासून):** 15:12 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:12 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/12/2024
**Time (वेळ):** 22:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 22:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** समाजकल्याण कार्यालय जालना येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 Total (चो...

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): रघुनाथ उत्तमराव पाडमुख

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1959

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खरपुडी ताजि जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खरपुडी ताजि जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9322523617

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुलोचना राहुल साबळे | | | 1. नुतन वसाहत विसावा शाळा जुना जा,कदीम -जालना, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लाचेची. | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक –

19.12.2024

फिर्याद

मी रघुनाथ उत्तमराव पाडमुख वय – 65 वर्ष, व्यवसाय – मजुरी रा. खरपुडी ता.जि. जालना मोबाईल नंबर 9322523617.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 18.12.2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहण्यास आहे. मी बक-या राखण्याचे काम करतो. त्यापासुन मिळणारे उत्पन्नावरती आमचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक 14.09.2023 रोजी मी माझ्या बक-या घेवुन सुरज भैय्या देवावाले यांचे खदानीवरती पाणी पाजण्यासाठी दुपारी 2.00 वा ते 02.30 वा चे दरम्यान जात असताना त्या ठिकाणी गणेश आसाराम खराबे पाटील हे त्यांची म्हैस चारत होता. त्या ठिकाणी मला गणेश खराबे यांनी जातीवाचक घाणघाण शिविगाळ देवुन या रस्त्याने जायचे नाही असे म्हणुन माझ्यासोबत भांडणे केल्याने मी त्यांचे विरुध्द दिनांक 17.10.2023 रोजी तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक - 688/ 2023 कलम 294, 504, 506 भादवि सह कलम 3(1)(r), 3 (1)(s) अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती कायदा 1989 या प्रमाणे अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल केला आहे.

मी अॅट्रासिटिच्या गुन्हयातील फिर्यादी असल्यामुळे मला अॅट्रासिटीच्या गुन्हयात सरकार कडुन पैसे आले आहेत काय याबाबत विचारपुस करण्यासाठी मी दिनांक 01.12.2024 रोजी समाजकल्याण कार्यालय जालना येथे गेलो होतो. त्या ठिकाणी जावुन मी अॅट्रासिटीच्या गुन्हयात माझे नावे पैसे आले काय याबाबत चौकशी केली. त्यावेळी त्या ठिकाणी असलेल्या अॅट्रासिटिच्या गुन्हयात येणारे पैशाचे काम पाहणा-या लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी मला तुमचे पैसे आले की नाही याबाबत मला माहीती नाही असे म्हणाल्या. त्यानंतर मी पुन्हा दोन तीन वेळा समाजकल्याण कार्यालयात जावुन मला मिळणारे पैशाविषयी विचारपुस केली त्यावेळी सुध्दा मला कोणी काहीएक सांगीतले नाही.

त्यानंतर आज दिनांक 18.12.2024 रोजी मी सरकारी दवाखाना जालना येथे उपचारासाठी आलो होतो. त्या ठिकाणी उपचार घेतल्यानंतर मी आज दुपारी 02.00 वा ते 02.30 वा चे दरम्यान समाजकल्याण कार्यालय जालना येथे जावुन त्या ठिकाणी अॅन्ट्रासिटीच्या गुन्हयात येणारे पैशाचे काम पाहणा-या लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी मला तुमचे समाज कल्याण कार्यालयातील खात्यावरती अॅट्रासिटीचे अनुदान रक्कम 75,000/- रुपये जमा झाले आहेत. मी तुमचे जमा झालेले 75,000/- रुपये तुमच्या पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती पाठवुन देते. त्यासाठी तुम्ही मला अगोदर माझे खर्चा पाणी साठी मला 5,000/- रुपये दया. तुम्ही जर मला माझे खर्चा पाण्याचे पैसे दिले नाहीत तर मी तुमचे पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती अनुदान रक्कम 75,000/- रुपये पाठविणार नाही असे मला म्हणाल्या. माझे मध्ये व समजाकल्याण विभागामध्ये अॅट्रासिटीच्या पैशाचे काम पाहणारे लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांचे मध्ये पैशाबाबत कोणत्याही प्रकारचा उसनवारीचा व्यवहार झालेला नाही. तसेच त्यांच्या मध्ये व माझ्यामध्ये कोणत्या ही प्रकारचा वादविवाद झालेला नाही.

तरी मी आज दिनांक 18.12.2024 रोजी समाजकल्याण कार्यालय जालना येथील अॅट्रासिटिचे गुन्हयात सरकारकडुन येणारे अनुदानाचे पैशाचे काम पाहणा-या लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना जावुन भेटणार आहे व त्यांना माझे अॅट्रासिटीच्या गुन्हयात आलेले अनुदान रक्कम 75,000/- रुपये माझ्या पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती पाठविण्याबाबत बोलणार आहे. त्यावेळी मला लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी स्वता अथवा

इतरामार्फत पैशाची मागणी केल्यास त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्यात यावी म्हणुन त्यांचे विरुध्द माझी तक्रार आहे.

सदर तक्रारी बरोबर मी दिनांक 17.10.2023 रोजी तालुका पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक- 688/2023 कलम 294, 504, 506 भादवि सह कलम 3(1)(r), 3(1)(s) अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती कायदा 1989 या ॲट्रॉसिटी दाखल गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल, माझे पोस्ट ऑफिस येथील खाते क्रमांक 032710277704 या खात्याचे पासबुक कार्डची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्राच्या छायांकीत प्रति पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांच्याकडे दिलेल्या आहेत.

त्यानंतर मी समाजकल्याण कार्यालय जालना येथील लिपिक श्रीमती साबळे यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय व ते मला लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी दिनांक 18.12.2024 रोजी मी पंच श्री. नितीन खरात यांचे सोबत समाजकल्याण कार्यालय जालना येथे जावुन लिपिक श्रीमती साबळे यांची लाचमागणी पडताळणी केली. त्यावेळी मी व पंच समाजकल्याण कार्यालयातील समाजकल्याण निरिक्षक यांचे कक्षात गेलो. त्यावेळी मला लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " आले का बाबा या आतमध्ये या या या " असे म्हणाल्या. त्यानंतर मी त्यांना म्हणालो की, " इथं बसु ". त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " हा इथे उभा रहा असे.. आसे उभा रहा ना ". त्यावेळी माझ्यामध्ये व लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांच्यामध्ये बोलणे झाले. त्यावेळी मी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना म्हणालो की, " महया लक्षात नाही राहीलं म्हणल.. तेवढयात फोन आला महया म्हणल जाउ दया.. ते किती राहीले ते महया लक्षात नाही राहीलं.. किती " ? त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी माझ्याकडे पाहुन त्यांचे उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन मला पाच हजार रुपये मागण्याचा इशारा केला. त्यावेळी मी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना म्हणालो की, " तोंडानं सांगा मंग तसं कस ". त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " सांगतली नं ". त्यावरती मी त्यांना म्हणालो की, " कसं तोंडान सांगा.. तसं काय समजतय.. तोडान सांगा ". त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " पाच.. पाच ". त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, " मोठयानं सांगा मला ऐकु येत नाही ".. त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " पाच..पाच..पाच ". तेव्हा मी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना म्हणालो की, " है पहा आपण कस बोलत आसतो.. मोठयान बोलांव मला ऐकु येत नाही नं ". त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " मंग आता तुम्हाला सांगुन दिली सगळ आता जा.. ". त्यावेळी मी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना म्हणालो की, " पाच हजार दयायचे न पाच.. " त्यावेळी लोकसेविका लिपिक श्रीमती साबळे मॅडम " हा " असे म्हणाल्या. त्यानंतर मी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना म्हणालो की, " उदया सकाळी किती वाजता येउ.. संध्याकाळी पोरग पैसे घेवुन येणार है ". त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " ठिक ". त्यानंतर मी त्यांना म्हणालो की, " सकाळी कीती वाजता येउ ". त्यावरती लिपिक श्रीमती साबळे मॅडम म्हणाल्या की, " या दहा साडे दहाला " त्यानंतर मी पंच श्री. नितीन खरात यांच्यासोबत समाजकल्याण कार्यालयातुन बाहेर आलो. त्या ठिकाणी आल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुटेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांचे सोबत झालेल्या संभाषणाबाबत पंच क्रं. 01 श्री. नितीन खरात यांना विचारपुस करुन सदरचे संभाषण ऐकले. त्यामध्ये लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी माझ्याकडे 5,000/- रुपयाची मागणी करुन सदरची रक्कम दिनांक 19.12.2024 रोजी समाजकल्याण कार्यालय जालना येथे घेवुन बोलविले असल्याने त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

मला समाजकल्याण कार्यालयातील लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी तक्रारदार श्री. रघुनाथ पाडमुख यांना शासनाकडुन मिळणारे ॲट्रासिटीचे गुन्हयातील अनुदान रक्कम 75,000/- रुपये तक्रारदार यांचे पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती जमा करण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम आज दिनांक 19.12.2024 रोजी समाजकल्याण कार्यालय जालना येथे घेउन येण्यास सांगीतले असल्याने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय जालना येथे मला , पंचाना व सापळा पथकास पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांनी सापळा कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या. मला लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी 5,000/- रुपये लाचेच्या रकमेची मागणी केली असल्याने सापळा कारवाई करीता मी माझे जवळील स्वकष्टाचे असलेले 5,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 10 चलनी नोटा पोलीस निरिक्षक मुटेकर यांच्याकडे दिल्या. त्यानंतर मला व पंचाना ॲंथ्रासिन पावडर बाबत माहीती देवुन सदर चलनी नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावुन त्याबाबतचे गुणधर्म समजावुन सांगीतले. त्यानंतर ॲंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 5,000/- रुपये चलनी नोटा माझे अंगातील पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवण्यात आल्या व सदर लाचेची रक्कम लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी स्विकारल्यानंतर माझे उजव्या हाताच्या शर्टाची बाही वरती घेवुन लाचेची रक्कम स्विकारलेबाबत इशारा करणेस सांगीतले.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डिंग चालु करुन व्हाईस रेकॉर्डिंग मशीन कोणालाही दिसणार नाही अशा प्रकारे माझ्या

बनियनला आतील बाजुस बांधण्यात आली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. नितीन खरात असे ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथुन मोटर सायकल वरती समाजकल्याण कार्यालय जालना कार्यालयात लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना भेटण्यासाठी गेलो. तेथे आजुबाजुला पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर व स्टाफ तसेच पंच क्र. 02 श्री. वृशाली नवले यांनी सर्वानी मिळुन सापळा लावला. मी व पंच क्र.01 श्री. नितीन खरात असे समाज कल्याण कार्यालयातील समाज कल्याण निरिक्षक यांचे कक्षात जावुन लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना भेटलो. त्यावेळी लिपिक श्रीमती साबळे मॅडम या मला म्हणाल्या की, खाली टाकुन दया ड्रॉवर मध्ये असे मला म्हणाल्या .त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, नाही मोजुन घ्या नं हातानं त्यावेळी मला लिपिक साबळे मॅडम म्हणाल्या की, नाही नाही हात नाही लावत ड्रावर मध्ये ठेवा. त्यावेळी मी लिपिक साबळे मॅडम यांना म्हणालो की, मोजुन देउ मॅडम पैसे म्हणजे काय कमी ज्यादा हय म्हणुन काय म्हणल्यावर उदया तुम्ही.त्यावेळी लिपिक साबळे मॅडम मला म्हणाल्या की, नाय तुम्हाला कायच म्हणणार नाही असे म्हणाल्या. त्यानंतर माझ्या मध्ये व लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांच्या मध्ये बराच वेळ बोलणे झाले. लिपिक साबळे मॅडम या मला लाचेची रक्कम 5000/- रुपये त्यांचे ड्रावर मध्ये ठेवण्यास सांगत असल्याने मी त्या ठिकाणावरुन निघुन पंचासह ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो. त्या ठिकाणी आल्यावरती माझे कडील व्हाईस रेकॉर्डिंग बंद करण्यात आले. त्यावेळी मला पंचासमक्ष पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांनी विचारपुस केली असता मी त्यांना लिपिक श्रीमती साबळे मॅडम या लाचेची रक्कम 5,000/- रुपये त्यांचे टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवण्यास सांगत आहेत. त्या माझ्याकडुन हातात पैसे घेत नसल्याने मी परत आलो असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांनी मला सुचना देवुन लिपिक श्रीमती साबळे सांगतील त्या प्रमाणे लाचेची रक्कम त्यांना देण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री. नितीन खरात असे पुन्हा ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथुन समाजकल्याण कार्यालय जालना येथे गेलो. त्या ठिकाणी गेल्यानंतर मला लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी बराच वेळ मला बसण्यासाठी सांगीतले. त्यानंतर बराच वेळाने लिपिक साबळे मॅडम या त्यांचे कक्षात आल्या असता त्यांनी मला त्यांचे कक्षात बोलावुन हाताचे इशा-याव्दारे लाचेची रक्कम 5,000/- रुपये त्यांचे बाजुचे टेबलच्या ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगुन टेलबचा ड्रॉवर उघडला. त्यावेळी मी माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम 5,000/- रुपये उजव्या हाताने काढुन टेबलच्या ड्रावर मध्ये दुपारी 03.12 वाजण्याचे सुमारास ठेवली. टिप सिसिटीएन प्रणालीमध्ये शब्द संख्या मर्यादा असल्याने सोबत पुढील फिर्याद जोडत आहेत.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sidharth jabaji mane(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

रघुनाथ

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sidharth jabaji mane
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

बराच वेळ मला बसण्यासाठी सांगीतले. त्यानंतर बराच वेळाने लिपिक साबळे मॅडम या त्यांचे कक्षात आल्या असता त्यांनी मला त्यांचे कक्षात बोलावुन हाताचे इशा-याव्दारे लाचेची रक्कम 5,000/- रुपये त्यांचे बाजुचे टेबलच्या ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगुन टेलबचा ड्रॉवर उघडला. त्यावेळी मी माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम 5,000/- रुपये उजव्या हाताने काढुन टेबलच्या ड्रावर मध्ये दुपारी 03.12 वाजण्याचे सुमारास ठेवली. त्यानंतर मी लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांचे सोबत बोलुन त्यांचे कार्यालयाचे बाहेर येवुन ठरल्याप्रमाणे दर्शनी भागात येवुन सापळा पथकास स्पष्ट दिसेल अशा रितीने माझे उजव्या हाताच्या शर्टाची बाही वरती घेवुन लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकास इशारा केला. त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर, पंच क्र. 02 व सापळा पथकातील स्टाफ यांनी घटनास्थळी येवुन लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले.

तरी दिनांक 18.12.2024 रोजी दुपारी 02.00 वा ते 02.30 वा चे दरम्यान समाजकल्याण कार्यालय जालना येथे जावुन त्या ठिकाणी अॅन्ट्रासिटीच्या गुन्हयात येणारे पैशाचे काम पाहणा-या लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी मला तुमचे समाज कल्याण कार्यालयातील खात्यावरती अॅट्रासिटीचे अनुदान रक्कम 75,000/- रुपये जमा झाले आहेत. मी तुमचे जमा झालेले 75,000/- रुपये तुमच्या पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती पाठवुन देते. त्यासाठी तुम्ही मला अगोदर माझे खर्चा पाणी साठी मला 5,000/- रुपये दया. तुम्ही जर मला माझे खर्चा पाण्याचे पैसे दिले नाहीत तर मी तुमचे पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती अनुदान रक्कम 75,000/- रुपये पाठविणार नाही असे मला म्हणाल्या. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारी वरुन त्याच दिवशी पंचासमक्ष लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी मला माझे अॅट्रॉसिटिच्या गुन्हयातील पैसे माझे पोस्ट ऑफिस मधील खात्यावरती जमा करण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दिनांक 19.12.2024 रोजी समाजकल्याण कार्यालय जालना येथील समाजकल्याण निरिक्षक यांचे कक्षात दुपारी 03.12 वाजण्याचे सुमारास लिपिक श्रीमती साबळे मॅडम यांनी त्यांचे कक्षातील टेबलच्या ड्रावर मध्ये लाचेची रक्कम 5,000/- रुपये स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन माझी श्रीमती सुलोचना राहुल साबळे लिपिक, समाजकल्याण कार्यालय जालना यांचे विरुद्ध माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी फिर्याद संगणकावरती टंकलिखित करण्यात आली असुन त्याची प्रिंट काढुन ती मी वाचुन पाहीली असता मी सांगीतले प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(शंकर म. मुटेकर)
पोलिस निरिक्षक, ला.प्र.वि जालना

फिर्याद दिली सही.